| | |
|---|---|
| MHKO050002372020 | **समरी क्रिमिनल केस क्र.१३६/२०२०**<br>**<u>मधील निशाणी क्र.३४ वरील आदेश</u>**<br>**सारडा टेक्सकॉम तर्फे राजेश सारडा विरुध्द मॉ दुर्गा ट्रेडींग कंपनी तर्फे सुनिता मणियार** |

आरोपी यांनी सदरचा अर्ज दाखल केला असून त्या द्वारे विनंती केली आहे की, प्रस्तुत कामी दि.१५/०३/२०२३ रोजी नो क्रॉस चा हुकूम झाला आहे. सदरच्या कामातील आरोपी हे वैयक्तीक कामानिमित्त राजस्थानला गेले असल्याने दरम्यानच्या काळात ते कोर्टात हजर राहू शकले नाहीत. सदरचा अर्ज मंजूर झालेस व आरोपीस उलटतपासाची संधी दिलेस खरी वस्तुस्थिती रेकॉर्डला येणार आहे. तरी सदरचा अर्ज मंजूर व्हावा, अशी त्यांनी विनंती केली.

२. फिर्यादी यांनी सदर अर्जावर निशाणी ३५ वर म्हणणे दाखल केले आहे की, त्यांच्या म्हणण्यानूसार सदर अर्जातील कथने चुकीची, खोटी व लबाडीची असून त्यांना ती मान्य व कबूल नाहीत. प्रस्तुत कामी फिर्यादी यांनी दि.०६/०८/२०२२ रोजी सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केलेले असून आरोपी यांना उलटतपासासाठी भरपूर संधी देवूनही सदरचे काम लांबवत ठेवण्याच्या हेतूने उलटतपास घेतला नाही अगर घेणेस चालढकल चालवली आहे. दि.१५/०३/२०२३ रोजी निशाणी १८ वर नो क्रॉस चा आदेश पारित झाला असून त्यानंतर दि.१८/०४/२०२३, दि.०९/०५/२०२३ व दि.१७/०६/२०२३ रोजी सदरचे काम नेमले होते. जवळपास तीन-चार महिन्याचा कालावधी झालेला असून आज रोजी म्हणजेच दि.२०/०७/२०२३ रोजी सदरचे काम लांबवत राहण्याच्या हेतूने दिलेला आहे. तरी सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जातील नमूद कारण की, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन संधी देण्यात यावी. सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता दोन्ही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. आरोपी यांनी वेळेत उलटतपास न घेतल्याने प्रकरण प्रलंबित राहिले. त्या करीता योग्य ती कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. सदरचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. आरोपी यांनी फिर्यादी यांना रक्कम रुपये ५००/- इतकी कॉस्ट दिलेनंतर सदर प्रकरणात त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी देणेत येते.

sd/-

**इचलकरंजी**
**दिनांकः१८/१२/२०२३.**

**(एम.एम.चौधरी )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.४, इचलकरंजी**